<u>**विशेष दिवाणी दावा क्र. ३२/२००७ मधील नि. क्र. ११६ वर आदेश**</u>

<u>CNR : MHSN05-001445-2007</u>

प्रस्तुतचा अर्ज वादींनी दुय्यम पुरावा देण्यासाठी परवानगी मिळावी याकरीता दिला आहे.

२. वादींचे म्हणणे असे की, वादींनी या कामी खरेदीपत्र व तारण गहाण खत यांच्या प्रमाणित सत्यप्रती हजर केल्या आहेत. हे दोन्ही मूळ दस्त प्रतिवादींच्या ताब्यात आहेत. वादींनी, हे कागद प्रतिवादींनी हजर करावेत, असा अर्ज निशाणी १०८ ला दिलेला होता. त्या अर्जावर प्रतिवादींनी, कागद आपल्या ताब्यात नाहीत, असे म्हणणे दिलेले आहे. अशा परिस्थितीमध्ये वादींना सदर दस्ताच्या प्रमाणित सत्यप्रती दुय्यम पुरावा म्हणून वापरण्यास परवानगी मिळावी याकरीता प्रस्तुतचा अर्ज दिला आहे.

३. प्रतिवादी क्र. २, ३ व ५ यांनी आपले म्हणणे याच अर्जावर दिले आहे. प्रतिवादींनी दोन्ही दस्त, त्यावरील सह्या मान्य केल्या असून दस्तही मान्य केले आहेत.

४. वादींच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादींच्या वकीलांनी प्रतिपादन केल्याप्रमाणे, प्रतिवादी क्र. २, ३ व ५ यांनी दस्त मान्य केलेले आहेत. निशाणी १०८ ला म्हणणे देवून प्रतिवादींनी मूळ दस्त आपल्या ताब्यात नसल्याचे कथन केले आहे. त्यामुळे दस्ताच्या प्रमाणित सत्यप्रती दुय्यम पुरावा म्हणून सादर करण्यास वादींना परवानगी देणे आवश्यक आहे. म्हणून पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

<u>**आदेश**</u>

अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

खरेदी दस्त व तारण गहाण दस्ताची प्रमाणित सत्यप्रती दुय्यम पुरावा म्हणून वापरण्यास वादींना परवानगी देण्यात येत आहे.

सही/-

इस्लामपूर. (श्रीमती सु. रा. पाटील)

दिनांक-१२.१२.२०१८ दिवाणी न्यायाधीश व. स्तर, इस्लामपूर